म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# “ कर्मवीर तानाजी मालुसरे ”

लेखक—श्रीयुत विरकुड.

किंमत ४ आणे.

प्रकाशक—
द्वा. वि. देशमुख

सन १९१८

मुंबईवैभव प्रेस गिरगांव मुंबई.

( रा. न. चिं. केळकर यांच्या अभिप्रायांतील उतारा )

रा. विरकुड यांस—

आपण तानाजीचा पोवाडा रचून त्या विषयावर आधींच असलेल्या अनेक पोवाड्यांत भर टाकिली याबद्दल आपलें अभिनंदन करितों. कांहीं आधुनिक स्वरूपाचे शब्द वगळले असतां आपल्या पोवाड्याची भाषा बरीच निर्दोष आहे. तीमध्यें जोरकसपणाही बराच दिसून येतो.................. असो. किरकोळ दोष वगळले असतां आपला पोवाडा बराच सरस वठला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं व अशा प्रकारचे प्राचीन व अर्वाचीन स्फूर्तिदायक विषय घेऊन आपण आपली शाहीरगिरी अव्याहत चालू ठेवाल अशी आशा आहे.

श्रीदत्त
१५६८

# प्रस्तावना.

नवीन कवी म्हटले म्हणजे सर्वच नीरस व प्रतिभाहीन असतात अशी कित्येक दिवसपर्यंत माझी समजूत होती किंवहुना उत्तम काव्य अर्वाचीन कवींच्या लेखणींतून बाहेर पडणें शक्यच नाहीं असें माझें ठाम मत होतें. अर्थात् या माझ्या समजुतीच्या अगर मताच्या मुळाशीं अर्वाचीन कवींच्या काव्याबद्दलचें गाढ अज्ञान होतें हें मला कबूल करणें भाग आहे. तरी पण अशा तऱ्हेची समजूत एकदां झाली म्हणजे ती दूर होणें फार कठीण असतें. कारण मग आपण सर्वच अर्वाचीन काव्याकडे दोषदृष्टीनें पाहूं लागतों, व कोणतीहि गोष्ट पूर्णपणें निर्दोष असणे शक्य नसल्याकारणानें त्यांत आपल्याला दोष दिसूं लागतात; व अशा रीतीनें पूर्वीची समजूत दृढ होत जाते.

तथापि चांगलें तें किती झालें तरी चांगलेंच. मनुष्य कितीहि दोष-दृष्टि असला तरी जर तो प्रामाणिक असेल तर त्याला चांगल्या गोष्टींचा चांगलेपणा भासल्यावांचून केव्हांहि रहाणार नाहीं प्रस्तुत काव्याचे कर्ते रा. विरकुड यांची कविता काळजीपूर्वक वाचण्याचा प्रथम ज्यावेळीं माझेवर प्रसंग आला त्यावेळीं त्यांची कविता मी याच समजुतीनें वाचली, पण त्यांत अस्सल प्रतिभा असल्यामुळें तिला वाईट म्हणण्याची माझी छाती होईना. एवढेंच नव्हे तर हळुहळू तिच्याबद्दल माझा चांगलाच ग्रह

१५६८

झाला, व नंतर क्रमाक्रमानें अर्वाचीन कवींबद्दलची माझी गैरसमजूतही दूर होऊं लागली. कारण मग मी अर्वाचीन कवींच्या काव्यांत दोष शोधण्याच्या भरीस न पडतां प्रतिभाच शोधावयास लागलों; व आश्चर्याची गोष्ट ही कीं, मला तशा तऱ्हेची प्रतिभा पुष्कळ ठिकाणीं आढळून येऊं लागली. अशा रीतीनें अर्वाचीन कवींबद्दलचा माझा अज्ञानमूलक ग्रह दूर केल्याबद्दल रा. विरकुड यांच्या प्रतिभेचा मी अत्यंत ऋणी आहें. हें लिहिण्यास मला फार आनंद वाटतो. व माझ्याप्रमाणेंच इतरांचा अर्वाचीन कवींबद्दलचा असद्ग्रह रा. विरकूड यांच्या पुढील लहानशा प्रतिभायुक्त काव्यानें दूर होईल अशी माझी समजूत आहे.

अंतःकरणाच्या प्रबल वृत्तींपासून शब्दद्वारा निर्माण होणारें काव्य तें चांगलें असें मला वाटतें. अशाच काव्याचा सहृदय वाचकांच्या अंतःकरणावर परिणाम होतो. केवळ बुद्धिनैपुण्याच्या जोरावरहि काव्योत्पादन होऊं शकतें, पण त्या काव्याचा फार झालें तर वाचकांच्या बुद्धि चकित करण्याइतकाच परिणाम होऊं शकतो. त्यापासून त्यांच्या हृदयवृत्तींवर यत्किंचितही परिणाम होणें शक्य नसतें. काव्याचा आस्वाद सहृदय अशा अशिक्षित माणसांनाहि घेतां येत असल्याकारणानें काव्याची गोडी अंतःकरणगोचर आहे, बुद्धिगोचर नाहीं हें सिद्धच आहे. सबब ज्या काव्याचा अंतःकरणावर इष्टतम परिणाम होतो त्यालाच उत्तम काव्य असें म्हणतां येईल.

अर्थात् अशा तऱ्हेचें काव्य कोणाही प्रबल मनोवृत्ती असलेल्या व त्या मनोवृत्ति शब्दद्वारा उघड करून दाखविण्याचें सामर्थ्य असलेल्या माणसाला करतां येणें शक्य आहे. तथापि अशिक्षित माणसापेक्षां सुशिक्षित माणसाला उपरिनिर्दिष्ट गुण असूनहि असें काव्य लिहिणें जास्त

कठिण जातें. आपण वाचलेल्या इतर कवींच्या काव्यांचा मनावर झालेला परिणाम पूर्णपणें बाजूला ठेऊन केवळ आपल्याला काय वाटतें हें लिहिणें हें काम अत्युत्कट मनोवृत्तींच्या कवींवांचून दुसऱ्याला फार दुर्घट आहे. पोवाड्यासारखीं निवळ प्रबलमनोवृत्तिमूलक काव्यें लिहिणें अशिक्षित शाहिरांस विशेष कठिण नाहीं. पण श्रेष्ठ कवींचीं काव्यें वाचलेल्या सुशिक्षित शाहीराला, पदोपदीं त्यांचें अनुकरण करण्याचा मोह होत असतां तो बाजूस ठेऊन पोवाड्यासारखें काव्य लिहिणें कठिण आहे असें माझ्या अल्प मतीला वाटतें. असें असूनही रा. विरकुड यांनीं आपल्या प्रतिभेच्या जोरावर पुढील जातिवंत पोवाडा निर्माण केला आहे याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

हरि दामोदर वेलणकर.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम काव्य
अनुक्रम ९८८४ ११-६-५०
दाखल

# स्वतःचे दोन शब्द.

वर्णणात्मक ऐतिहासिक कविता ही उच्चप्रकारच्या भावनामय कल्पनापूर्ण किंवा प्रासादिक काव्याच्या मानानें दुय्यम दर्ज्जाची आहे. पोवाडा हा बारकिसारीक ऐतिहासिक सत्याकडे कानाडोळा करून विषयाला आधारभूत धरलेल्या वीराचें शौर्य-धैर्यादि गुण उज्वल स्वरूपांत रेखाटण्याची संधि वाया दवडीत नाहीं. अतएव पहिल्या प्रतिचें काव्य किंवा इतिहासाचें सत्य यांच्या दृष्टीनें ऐतिहासिक पोवाडा गौणच ठरतो. उत्तम काव्याला लकलकणाऱ्या तरवारीची उपमा दिली व बारीकसारीक ऐतिहासिक मुद्यांनां सुईच्या नीटनेकेपणाची उपमा दिली तर या पोवाड्याला पाथरवटाच्या ओवड धोवड टणक घणाची उपमा देण्यास कांहीं हरकत नाहीं; आणि मग राष्ट्रीय ऐक्य व व्यवहारीक जूट या कणखर तत्वांचाच याचा मुख्य भाग बनविला आहे. व मागचा रंगीत दांडा फक्त कांहींसा काव्याचा आहे असेंही म्हणण्यांत कोणताच प्रत्यवाय नाहीं. तीक्ष्ण तरवारीच्या किंवा नाजुक सुईच्या कार्यक्षेत्रांहून ह्या ढोबळ घणाचें सुद्धां भिन्न असें कार्यक्षेत्र आहेच. त्या कार्याकडे याचा थोडाबहुत उपयोग झाल्यास श्रमाच्या शतपट मोबदला मिळाल्या सारखें होईल.

प्रस्तुतच्या लहानशा लेखनाला प्रास्ताविक चार शब्द जोडण्याचें काम माझे परम पूज्य गुरुवर्य ( सध्यांचे वुईलसन कॉलेजांतील संस्कृतचे अध्यापक ) प्रो. ह. दा. वेलणकर. एम्. ए. यांनीं मोठ्या प्रेमानें केलें

काव्य ३०७



याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. तसेंच श्रीमति. सौ. अवंतिकाबाई गोखले, रा. न. चिं. केळकर, केसरीचे संपादक यांचा माझा पूर्व परिचय नसतां इतर महत्वाचे व्यवसाय बाजूला ठेऊन आपापल्या अमोल अभिप्रायांनीं या छोट्या पुस्तकाला उचलून धरिलें त्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहे.

मित्रमंडळी पैकीं रा. द्वा. वि. देशमुख यानीं वेळोवेळीं महत्वाच्या सूचना दिल्या व पोवाड्याच्या सुवाच्य प्रती स्वहस्तानें मोठ्या मेहनतीनें काढून दिल्या, तसेंच रा. द. वि. सबनीस यानीं पुस्तक छापण्यास सर्व द्रव्य साहाय्य केलें म्हणूनच या पोवाड्याला छपाईचा सर्व साज चढवून आज दसऱ्याचे मुहूर्तानें मुंबापुरीच्यां विथींतून मिरविण्याचा मंगल दिवस लाभला आहे.

मुंबई आंबेवाडी
ता. १४-१०-१८

स. गो. विरकुड.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
क्रि: ..................
.................. 
.................. 

## श्रीमति सौ. अवंतिकाबाई गोखले म्हणतात.

रा. रा. विरकुड यांनीं लिहिलेला हा पोवाडा वाचित असतांनां त्या कालीन इतिहासाचें चित्र हुबेहूब डोळ्यांपुढें उभें राहतें. तानाजीची जाज्वल्य देशप्रीति, निस्सीम स्वामीभक्ति व अचाट धाडस या गुणांचा उत्तम परिचय हा पोवाडा करून देत आहे. विशेषतः हा पोवाडा लहान मुलांचे तोंडीं असल्यास त्यांनां आपल्या पूर्वजांची चांगली आठवण ठेवील; व याचा रेसिटेशन प्रमाणें समारंभाचे वेळीं म्हणण्याचा प्रघात पडला तर फार चांगलें होईल.

वा. क्र. ३८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि: ..................

## आवाहन

सोड समाधी राष्ट्र शाहिरा आजवरीचें मौन पुरे
स्वातंत्र्याचे उत्कर्षाचे गा पोवाडे खरे खुरे
स्फूर्तिप्रबोधक वीरकथांची गुंफ गोवणी प्रतिभेची
राष्ट्रभावना सोज्वळ चमको राख झडुनि शैथिल्याची
ती फुंक तुतारी फुंक दमानें पुन्हा
प्रेतांत पेटवी संजीवक चेतना
उसळुंदे शिरांतुनि रक्त नवें सणसणा
वातावरणा भेदुनि गाठीं थेट स्वर्गमंदिरें
तुतारी फुंकुनि दीर्घ स्वरें !

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ७५६
शाखा

# तानाजीचा पोवाडा

चौक १ ला.

तार चढवुनी मार डफावरि थाप साथ दे सलगीची
ऐका सादर वीर मराठे स्मरणें पूर्वज कीर्तीचीं
इतिहासाचें पान चकाकें शर्थ जाहली शौर्याची
समरीं पडल्या अमर जाहल्या वीरगडी तानाजीची
ज्या शौर्याच्या सहवासानें दीन मावळे समरांत
चमकुनि झाले वीर विक्रमी कीं न असे नर यवनांत
शिवरायाची राष्ट्रकल्पना सत्य करुनि रचिला पाया
महाराष्ट्र राज्याचा झेंडा भारत भूवरि मिरवाया
ऐक्य भावना राष्ट्रकल्पना स्थिर करुनी जनलोकांत
आत्मभाव मनिं जागृत केला नांव गाजलें प्रख्यात
उठा मराठे लुटा यशाचे घट भरले कांठों कांठ
कृतींत उतरा अमर शौर्य तें शब्दाचे नच व्हा भाट
महाराष्ट्राचे बुरूज पडके पटवितातिं या स्मरणास
गडागडावरि पिंपळपानीं हाच गोंविला इतिहास
रक्त सांडलें देशभरीं तें पदोपदीं तुडवित असतां
प्रतिथडग्यांतुनि ध्वनी सांगतो गत शौर्याची तीच कथा
तार चढवुनी मार डफावरि थाप साथ दे सलगीची
ऐका सादर वीर मराठे स्मरणें पूर्वज कीर्तीचीं

चौक २ रा.

राज्यमंदिरा कोंदणं द्याया कोंडाणा घ्यावा ऐशी
शिवरायाची आज्ञा झाली यवनावरि करुनी सरशी
पैज लावुनी विडे मांडिले जमवुनि सारे सरदार
पुढें सरकतो कोण पाहुं या छातीचा निधडा वीर
शिवरायाचा सखा जिवाचा राज्याचा उजवा हात
सरसावुनि तानाजी उठला सर्व सभा करुनी चकित "
तेजाची तरवार उपसली त्याच क्षणीं म्यानांतून
हात घातला विडा उचलला पण तेव्हां दारुण करुन
"विवाहास रायाच्या आलों तुम्हांस करण्या बोलवण
"परी गडाच्या हा लग्नाचा या मध्येंच झाला शुभ शकुन
आण वाहतों ध्यान असूं द्या स्मरण करुनि शिवपायाचें
पडे कोंडणा तोंवरि आतां लगिन लांबलें रायाचें
परान्न पोशित तनु शृंगारुनि तुष्ट पुष्ट झाला एक
यवन नृपाची करी चाकरी नांवाचा रजपुत लेक
उदय भानु हें नांव समूळीं आत्मभाव मेला ज्याचा
निमक खाउनी तत्पर राही गुलाम बंदा यवनाचा
स्वाभिमान निज विकुनि टाकिला लोप होत स्वातंत्र्याचा
उदय कशाचा भानु कशाचा अस्ताचि तो सर्वस्वाचा !
सेनासागर प्रबल शिरांतुनि रक्त उडे भरज्वानीचें
उमरावाचें वैभव भोगी नांव कथी दिल्लीपतिचें

C ' 331-957



उठा मराठे लुटा यशाचे घट भरले कांठोकांठ
कृतींत उतरा अमर शौर्य तें शब्दाचे नच व्हा भाट

चौक ३ रा.

निश्चय झाला वेष बदलला पाटिल सजला तानाजी
बोले किल्ल्यावरील कोळी कार्याला केले राजी
"माय भवानी प्रसन्न वदनें धरिते ज्याच्यावरि छत्र
"काय गड्यानों भक्त तियेचे अझुनि न त्या समजा मित्र
"राय शिवाजी राज्य हिंदवी प्रस्थापित करण्यां सजला
"माय भूमिचे पूत खरे तर त्यास करूं या मदत चला
"रांडा पोरें एक विचारें देउनि बसलां परक्यांना
"पुरुषार्थामधिं अर्थ न उरला भरला सगळा भ्यांडपणा
"जागेपणिं कां डोळे मिटितां जिवंत असुनी प्रेतकळा
"पूर्वज कीर्तीवरी फांशिता हात खुशीनें कां काळा
"राष्ट्रगिरी सोनेरी शोभे स्वराज्यरवि उदया आला
"या शुभसमयीं शिवरायानें भगवा झेंडा फडकविला
"अणुरेणूंमधिं संचरलें अजि राष्ट्राचें अवसान नवें
"कीं सत्वाचे वीर दमाचे स्पर्धेनें पुढतीं यावें
"उठा मराठे लुटा यशाचा घट चमके कांठोकांठ
"राष्ट्राचा रणयज्ञ पेटला रक्ताचे वाहति पाट
हृदयें हललीं, मनें विथरलीं, वश झाले सारे कोळी
तानाजीच्या स्फूर्तिरवानें सावध ते झाले वेळीं

शिवरायाचें कार्य साधलें भेद मिळाला किल्ल्याचा
डोणागिरिवरि मनीं आणिलें बेत करावा हल्ल्याचा

चौक ४ था.

हातांत काठी भाला बरची सेना ही तानाजीची
राज्यकारणीं रक्त सिंचनीं रात्र पाहिली अवसेची[1]
आसपासचें दिसे न कांहीं उमगेना कोणा कोण
कोल्ह्यांच्या भेसूर निनादें गजबजले सारें रान
काळोखांतुनि मार्ग उमगला देश भक्तिची ज्योत भली
स्वराज्यरविचीं प्रसन्नकिरणें मदतीला धाउनि आलीं
साधी भोळी मावळ सेना स्थापि हिंदवी राज्याला
सिद्ध जाहली विद्ध कराया तिला न कोणी ही धजला
ऐक्याचे नच धडे गिरविले जाउनि कुठल्या शाळेंत
तुलनात्मक नच परक्यांचे इतिहास तयांच्या स्मरणांत
नेमस्तांची नेमनिशाणी जळजळाट वा जहालांचा
कधीं न आला मनीं तयांच्या मार्ग पुढें धोपट त्यांचा
राय शिवाजी, राज्य हिंदवी, माय भवानी मोक्षाची,
संघ साधुनी चंग बांधुनी ध्वजा रोविली ऐक्याची
या संघावर त्या शतकाभर झुंजत यवनांचे वीर
भागुनि गेले हतबल झाले बोथट करुनी तरवार
ध्येय साधलें एक न उरला अपसांतिल कलहा वाव
अमर जाहले समरीं पडले आजवरी उरलें नांव

---

१ अवसेची ह्मणजे कृष्णपक्षांतील रात्र एवढाच अर्थ घ्यावा.

डोणागिरिचा कडा पुढें हा सुळक्यासम मोठा उंच
खोऱ्यांतुनि खालूनि मावळे जलदीनें करिती कूच
आज्ञा झाली; सर्व थबकले; सोलाची आली पाळी
आत्मार्पण करण्यास पाहिली रात्र अशी भीषण काळी
पहाडावरुनी बिकट जाउनी सर केले जों कैक गड
यशवंती हें नांव पावली तानाजीची घोरपड
शेंदुरि माथीं कटीं शृंखला लांब भली बळकट फार
' जय स्वामिनी देवि भवानी ' म्हणुनि सोडिली तीस वर
पुन्हां चढविली पुन्हां परतली उंच न जाई घोरपड
तानाजीच्या आत्मबलाचा लव नच झाला परि बिघड
यशवंतीवर हात मारुनी नांव भवानीचें घेत
' धांव एकटी भक्त संकटीं लाज आजि राखी येथ '
तार चढवुनी मार डफावरि थाप साथ दे सलगीची
ऐका सादर वीर मराठे स्मरणें पूर्वज कीर्तीची

चौक ५ वा.

तडफ सरशी तिच्यांत आली चैतन्याची नवी कळा
खबदाडामधिं जाउनि बसली आटे घालुनि बुरुजाला
सोल लागला, छान सरकला तानाजी सर्वां पुढतीं
सुखांत पट्टा झगझगीत तो तेखानें चढला वरतीं
हातांत घेउन शिरें पटापट वीर किती त्याच्या मागें
चढुनी गेले त्या बुरुजावर पहारेकरि झाले जागे

पहिला पट्टा तानाजीचा गरगर फिरला चौफेर
निजरुधिरामधिं लोळत पडले बुरुजाचे रक्षक चार
वीर मराठे करीं बावटे वर चढले पाठोपाठ
त्या बुरुजावर ध्वजा रोविली जयसूचक मारुनि गांठ
निवडक आले वीर भराभर सोलावरि चढुनी सारे
सेना शिल्लक उभी राहिली किल्ल्याचीं रोखुनि दारें
सुरा पिऊनी ऐषारामीं विसरुनि कर्तव्या पार
पेंगत होते जागोजागीं किल्ल्याचे नाकेदार
उदयभानुही निजला होता सुखशय्येवर निश्चिंत
धांवत आला दूत एक तो धोक्याची वर्दी देत
भीति मनाची पार झुगारुनि दडपण तें नयनीतीचें
सुखचषकावरि आपक झाला ग्रह समजुनि हे उच्चीचे
पूर्णशांततेमधूनि अवचित तुफान फांफावत येत
दुबळ्यादुनिये मधुनि मावळे वीर उपजले विक्रांत
हल्ला परि अजि किल्ल्यावरि या गिल्ला गनिमांनीं केला
उदयभानुच्या सुखशांतीचा संभ्रम पूर्ण लया गेला
इतिहासाचें पान चकाके शर्थ जाहली शौर्याची
समरीं पडल्या अमर जाहल्या वीरगडी तान्हाजीची

चौक ६ वा.

भयसूचक मग शिंग फुंकिलें घाईनें जमली सेना
गर्दी झाली शिस्त न उरली कोण कुणाला गवसेना

अर्धे उघडे अर्धे मिटले झोपेंतुनि चोळित डोळे
शस्त्र घेउनी निःशस्त्र कुणी गफलतींत सारे जमले
काळोखाची ती अवसेची रात्र चहुंकडे भेसूर
काळोखांतुनि चमकत राही मधुनी मधुनी तरवार
सुनीळ गगनीं शांत तारका तेजाचे जळते दीप
स्तिमित जाहल्या पाहुनि भूवरि निकराची कापाकाप
शांति, स्थिरता, दया, सत्यता, चिर करण्यास्तव आजवर
देवाचें साम्राज्य महीवर स्थापाया गळतें रुधिर
रक्तांतुनि ही शुभ्र पताका शांतीची फडकेल कधीं
आज वाहले शांतीकरितां प्रिय रक्ताची भली नदी
रोग निराळा मात्रा भलती देण्याची ही काय कला
अगणित होती खून रणीं परि नांव दुजें मोहक त्याला
रणकुंडामधिं नरयज्ञाच्या अविरत देउनि आहुतिला
कोण जाहला स्वतंत्र केव्हां किती स्थापिली शांतीला ?
स्वातंत्र्याची जोड शेवटीं गुलामगिरीची कीं बेडी ?
शास्त्र पंडितां कुणा न याचीं अद्यापी सुटलीं कोडीं
कर्म कृतीची व्यवहाराची गोष्ट परी अगदीं भिन्न
राज्यकारणीं देहअर्पणीं राष्ट्रवीर नसती खिन्न
चला; लागलें तोंड मिळालें दोन दळें आलीं सरशीं
राष्ट्रवीर कीं भाडोत्री ते कोण आतां करितो सरशी

सूत्रधारसा आज्ञा देउन हळूंच मागें बसणारा
तानाजी हा नायक नव्हता पुढें सरे तीरासारा
एक दोन वा तीन किती ते यवन वीरवर लीलेनें
धूळ चारिली, भूल उडविली प्रतिपक्षांची वीरानें
अजब चलाखी गरगर फिरवी असिधारा मंडलाकृती
शिरें पटापट प्रतिपक्षाचीं सन्नाति त्या करुनी पडतीं
सेनासागर यवनांचा परि हटत चालला वेगानें
जणूं प्राशिला अगस्ति मुनिनें सप्तवारिधी आचमनें
चढत चालली ध्वजा यशाची नभीं चढे हरहर घोष
दिन् दिन् उठती शब्द हीनसे अल्लानें केला रोष
चकित जाहला वीर दमाचा उदयभानु पाहुनि फार
भेकड दुबळा भाडोत्री तो यवन नृपाचा दळभार
उडी घालुनी नव्या दमानें समरांगणिं ठाके वीर
घेउनि पट्टे दोन्हि करामधिं दों बाजुस करण्या वार
निजसेनेला धीर द्यावया वीर म्हणे " कोठें जातां
"दीन मावळे अजागळांची काय अशी पर्वा करितां
" सम्राटाचे प्यार जिवाचे दरबारी तुमचा दर्जा
"काठि घोंगडी पाठि लागली जरा न कां त्याची लज्जा?"
पुन्हां उलटले यवनवीर ते पुन्हां लागलें तोंड रणां
रुधिरें सरलीं शिरें उडालीं करित नभांगणिं भणाभणा

उठा मराठे लुटा यशाचे घट भरले कांठोकांठ
कृतींत उतरा अमरशौर्य तें शब्दाचे नच व्हा भाट

चौक ७ वा.

रक्त सांडलें कर्दम झालें शत्रुमित्र हीं समजेना
राष्ट्राचा रणयज्ञ धडाडे क्षुद्र लेखिलें प्राणानां
वीर पुढारी पुढें सरकले रक्तानें माखुनि अंग
उदयिंभानु ये द्वंद्व कराया युद्धाला चढला रंग
कुशल हत्यारी समतरवारी तडफीनें बदलित चौक
झडप लागली कौतुक करण्या शत्रुमित्र झाले एक
डाव चढवुनी घाव घालती वार दुजाचा चुकवून
हार न खाती दोहां वरतीं समर वसे अंवलंबून
दोन्हींकडचीं दळें भोवतीं युद्धचमत्कारा यांच्या
पाहत होतीं भाव विसरुनी क्षणभरि तो शत्रुत्वाचा
महाराष्ट्राच्या अदृष्टाचा स्पष्ट नभामधला तारा
स्तब्ध राहिला, गती विसरला; निश्चल हृदयाच्या तारा
यवनांचा तो चांद बिजेचा स्वामींचा भगवा झेंडा
निश्चल होते समोर दोन्हीं लव न हले त्यांचा गोंडा
पवन विसरुनी जवन गतीला स्तब्धपणें सेवी मौन
जयसूचक मनिं म्हणे निशाणा कुठल्या देऊं मी चलन
दिवसाचा दळभार जमवुनी रात्रीचा रोखुनी गड
दमला होता वीर शिवाचा तानाजी जीवापाड

शर्थ करूनी निजशौर्याची पहिली उसळी यवनांची
परत लाविली श्रमित जाहली सामुग्री तानाजीची
वार लागले शरीर झालें रक्त सांडुनी संत्रस्त
बाहु गळाले पट्टा थकला हात न तडफीचा उठत
उदयभानु तर वीर दमाचा रजपुत हाडाचा मत्त
समर कुशल तो तरवारीची झाली नच इच्छा तृप्त
हात फेंकिला तरवारीचा कौशल्याच्या सीमेचा
महाराष्ट्राचा प्राण खेंचिला हात जानव्याचा त्याचा!
तोंच तुटेली नभीं तारका तेजाची मोठी एक
तोंच मराठे ध्वजास बसला जोराचा मोठा झोंक
तोंच सांडला शिवरायाच्या हातांतिल ताटीं घास
तसाच उठला मग्न विचारीं हांक मारिली देवीस
' धांव भवानी कुलस्वामिनी ! भक्त संकटीं घाल उडी
मोडूं बघते आज अकालीं स्वातंत्र्याची नवी घडी
राष्ट्राचा हा गोंधळ अंबे ! तुझ्याच नवसाचा
पार करीं अभिमान जरी लव असेल ब्रीदाचा
तव अष्ट भुजांची अचाट शक्ती भरी
नरवीर मावळे रणीं यशस्वी करी
अवतार प्रलयकालचा भूवरी धरीं
महाराष्ट्राचें निशाण रक्षी धरुनि उंच निजकरीं
चारुनी धूळ रिपूला पुरी '

## चौक ८ वा.

वीरांचा उत्साह वितळला धैर्याचा डोंगर पडला
ऐन उमेदीमधें महाराष्ट्राची खचली कोनशिला
दिन् दिन् करुनी यवनदळानें हल्ला केला एकमतें
वीर मराठे उदयभानुच्या विजयानें कचरत होते
पाय काढिला रणांगणांतुनि जिकडे ज्या फुटली वाट
चोंहिंकडे फांकले मावळे यवनांनीं धरली पाठ
जुन्या हडाचा खरा मराठा मामाजी शेलार भला
वेळ पाहुनी संकट जाणुनि स्फूर्तीनें पुढती झाला
उमर जाहली ऐंशीच्या वर आव आणिला वीशीचा
घाव घातला उदयभानुवर डंका झडला कीर्तीचा !
उदयभानु तर भरज्वानीचा वयस्क मामा शेलार
पार्थ पितामह विषम धुरंधर परस्परांशीं भिडणार
वृद्धानें मग हांक मारिली " फिरा मावळे कां पळतां
" बुरुजाचे मी दोर कापिले व्यर्थ कडेलोटीं मरतां
" सर्वस्वाची भिस्त ठेउनी निवडक जीवाचे प्यारे
" जमवुनि तुम्हां घेउनि आला भ्याड तेच बनलां कां रे
" रक्त सांडलें प्रिय वीराचें, नयन होउंद्या आरक्त
" वार लागले त्यास, करीं तरवार धरुनि व्हा उद्युक्त
" कर्तव्याची ध्येयसफलता याच क्षणीं द्या आणोनी
" मरणांतुनिही हंसेल तुमचा वीर धन्यता मानोनी

" लाज वाटुंद्या आज पहा हा म्हातारा तुमच्या पुढतीं
" या दुष्टाला दाखवितों मी राष्ट्र शिपायाची महती
" मरण नव्हे हें अमर व्हावया वेळ बघा ही सोन्याची
" राष्ट्र कवीला या इतिहासें स्फूर्ति होउंद्या गाण्याची
" अंगांगांतुनि तान्हाजीच्या गळती रक्ताच्या धारा
" अंशांशानें तसा चढूंद्या शौर्याचा तुमचा पारा
" रायगडाहुनि शिवराथाच्या नैराश्याचे निःश्वास
" काय न आले श्रवणीं धरितां स्त्रैणपणाची कां कास
" मरणांतुनि या ध्येयसफलता निश्चित जन्मा येईल
" मरणांतुनिही उठेल तुमचा कीर्तिगंध तो चिरकाल
" तरवारीचा हात न सुटला मरणांतहि तानाजीचा
" जिवंत असुनी थरथर कांपे हातांतिल पट्टा तुमचा
" दरवाजावर धांवा कांहीं रक्षक कापुनि तो उघडा
" सूर्याजीसह शिल्लक सेना यवनांवरि इकडे सोडा."

चौक ९ वा.

दरवाजावर चकमक झडली मात मराठ्यांनीं केली
दार उघडुनी मावळ सेना वेगानें वरती आली
सूर्याजी तर सिंहासारा येत रणाच्या चौकांत
तळमळ हृदयीं तानाजीनें काय घडविलें समरांत
मामास करी सवाल निकडीं " वर्तमान झडकरि बोल
" कसें वर्तलें सांग रणाची कुठवर आलीसे मजल

ढा·क्र·१५६८



" बंधु दिसेना तानाजी कां सैन्य उधळलें चौफेर
" यवनांचा जयघोष वाढतो नशिबाची उलटी खैर ? "
वेळ ओळखी शेलार मनीं, म्हणे न याला सांगावें
तानाजीच्या वृत्तांताला रूप आतां भलतें द्यावें
" बा सूर्याजी ! तव तानाजी झुंजत दुसऱ्या चौकांत
" निकराची वघ लढत लागली तूंहि करी इकडे मात
" आणिबाणिची वेळ रणाची धरिं सिंहाचा अवतार
" फिरव मावळे मागें रणिं जा मार मजेची तरवार. "
वीर उसळला सिंहासारा उलटुनि यवनांवरि पडला
भयाण रात्रीं रंग चढे मग भीषणतर संग्रामाला
डाव घातला असा सफाई अवसर नच दे शेलार
तोंड न उरली मोडुनि पडली उदयभानुची तरवार
दुजा क्षणाला उलथुनि पडला गुलाम यवनांचा बंदा
छातीवरती बसे भीमसा वीर शिवाजीचा खंदा

* * * *

सूर्याजीच्या सूर्यप्रभेची साक्ष पुरी पटली ज्याला
समशेरीची धार चाखण्या उभा न राही थाऱ्याला
डौलदार तो करी पवित्रा फेर फिरे चपलाईचे
अगणित झेली वार ढालिवरि शत्रूच्या तरवारीचे
निमिषाचाही अवसर नच दे हात सफाईचा फिरत
यवन फांकले टाकुनि अपुलें निशाण कुठल्या कोनांत

भगवा झेंडा स्वैर फडफडे वारे सुटले राष्ट्रीय
तारांच्या अक्षता नभांतुनि उधळित पूर्वजसमुदाय
मोळी जाळुनि तोंच अग्निचा डोंब दिला भडकावून
रायगडावरि टाळी पडली राजाला पटली खूण
इतिहासाचें पान चकाके शर्थ जाहली शौर्याची
समरीं पडल्या अमर जाहल्या वीर गडी तान्हाजीची

चौक १० वा.

प्रेतावरचा पडदा हलला सूर्याजी जवळीं गेला
वस्त्र सारुनी दूर ओळखी निजबंधूच्या प्रेताला
स्पष्ट हालती वीरओष्ठते दाद न देतां मरणास
स्वयशाची जणुं वार्ता पुशिती कोण पुढें येई त्यास
म्हणे "जाहला विजय आपुला ऊठ झणीं वीरा राया
" प्रिय बंधूची सूर्याजीची लव न तुला कां येत दया
"शिवरायाच्या राज्यकारणीं मांडुनि आपुला व्यवसाय
" मधेंच जाणें सोडुनि त्याला हा कुठला बापा न्याय
" सेना झाली अनाथ आतां धीर तिला कोणी द्यावा
प्रिय पुत्राचा रायाजीचा विवाह कोणी लावावा ? "
" भगवा झेंडा उंच धरा जय आपुला ना झाला सांगा ?
" रामराम मज आज सुखानें घेण्याला झाली जागा. "
शब्द उमटले प्रेतांतुनि कीं भास असा सर्वा होत
निवांत झालें, सर्व संपलें, थंड पडे प्राणज्योत

प्रणाम करुनी त्या वीराच्या त्या शूराच्या प्रेतास
सेना सगळी खडी संभोंती गाळित अविरत अश्रूंस
त्या अश्रूंचें- कीं मोत्यांचें- सोज्वल मालालंकरण
म्हणति तारका नभांतुनी हा मिळेल कां आम्हां मान !
सिंह निमाला गड सांपडला 'सिंहगडचि पडलं नांव
ठाउक हा इतिहास पंडितां शब्दाचा साधा भाव
मनाला पाझर फुटला वीरकथासहवासानं
स्वत्वाची जाणीव कुणाला होइल कां या गाण्यानं ?
मालुसरे नरवीर निमाला शर्थ जिवाची करून
गीत यशाचें गाच शाहिरा ताल डफावरि धरून
दे अणुरेणूंमधिं भरून
ती चमक विजेची फिरून
हें सोड हृदय थरथरून
देशभक्तिनं दगडहि हलवीं आपुल्या जागेवरून
अवकाशांतुनि अविरत उठवि प्रतिध्वनी दुमदुमून
डांग तव ठोंक समेळावरून !!

---

वा. क. ९५६८